


शनिवार, दि. २७ जुलै २०१३


पिकनिक स्पॉट पहा
पान क्रमांक ८/९

VIDEOCON
Experience Change

# मुंबईचा आध्यात्मिक चेहरा!

भगवान गौतम बुद्ध यांना ज्ञान प्राप्त झाले आणि या युगपुरुषाने जगाला सत्य, शांती, सदाचार व निसर्गाच्या नियमांचा परिचय अगदी सोप्या व सरळ शब्दांत करुन दिला. दु:खाचा उगम व अंत कोठे आहे हे उदाहरणासह पटवून दिले. पण, हे नियम कोणते आहेत? ती उदाहरणे कोणती आहेत? या महापुरुषाला नेमके कोणते ज्ञान प्राप्त झाले? या सर्व प्रश्नांची उत्तरे म्हणजे 'विपश्यना विद्या.' ही विद्या अवगत करुन आयुष्य सुखी होते व शेवटही आनंदी होतो. अशी ही महत्त्वपूर्ण विद्या शिकण्याचे, त्याचा अभ्यास करण्याचे व त्याबद्दल जाणून घेण्याचे स्थान म्हणजेच पॅगोडा. अशी ही आध्यात्मिक व भव्यदिव्य वास्तू मुंबईतील बोरीवलीच्या गोराई खाडीजवळ उभी आहे.





'विपश्यना' ही महत्त्वपूर्ण विद्या भारतातूनच नाही, तर जगातून लुप्त झाली होती; मात्र म्यानमार देशात ही विद्या तिच्या मूळ व शुद्ध स्वरुपात गुरु-शिष्य परंपरेने टिकून होती. म्यानमारमधील विपश्यनाचार्य सयाजी ऊ बा खिन यांच्याद्वारे गोयंका यांना ही विद्या मिळाली. त्यांनी या विद्येला पुन्हा जगभरात पोहोचवले.

गोयंका हे या विद्येला शुद्ध स्वरुपात जिवंत ठेवणाऱ्या म्यानमारचे व विपश्यनाचार्य सयाजी ऊ बा खिन यांचे ऋण विसरले नाहीत. या ऋणांची आठवण सदैव भारतासह सर्व जगाला राहावी यासाठी गोयंका यांनी या पॅगोडाची मांडणी म्यानमारमधील प्रसिद्ध श्वेडगॉन पॅगोडाप्रमाणे केली आहे.

Siddhitech Home Pvt.Ltd.

### रक्तपेढी

| | |
|---|---|
| बोरीवली रक्तपेढी | (०२२) ६७३०६८०९ |
| नवजीवन रक्तपेढी | (०२२) २८९३४११२२ |
| सवर्धन हायटेक ब्लडबँक | (०२२) २८७१४०६० |
| सौ.मीनाताई ठाकरे ब्लडबँक | (०२२) २८७९७५८६ |
| मानस सेरोलॉजिकल ब्लडबँक | (०२२) ६१४२६६८५ |

### पिनकोड

| | |
|---|---|
| दहिसर | ४०००६८ |
| बोरीवली (पू.) | ४०००६६ |
| बोरीवली (प.) | ४०००९२ |
| कांदिवली(पू.) | ४००१०१ |
| कांदिवली(प.) | ४०००६७ |
| मालाड | ४०००६४ |
| गोरेगाव(पू.) | ४०००६३ |
| गोरेगाव(प.) | ४०००६२ |
| आरे कॉलनी | ४०००६५ |
| जोगेश्वरी(पू.) | ४०००६० |
| जोगेश्वरी(प.) | ४००१०२ |

## गोरेगाव ते दहिसर Helpline

### विभागातील कॉलेज

| | |
|---|---|
| **दहिसर** | |
| शैलेंद्र कॉलेज | (०२२) २८४८९६६४ |
| विद्याभूषण ज्यु. कॉलेज | (०२२) २८९७४०९७ |
| **बोरीवली** | |
| सेंट फ्रान्सीस ज्यु. कॉलेज | (०२२) २८९३१५५८ |
| आर.आर.इंटरनॅशनल कॉलेज | (०२२) २८९४६५५० |
| संस्था कॉलेज | (०२२) २८६२६५६७ |
| एस.एस.पी. मंडळ कॉलेज | (०२२) २८९७१५४८ |
| श्री. भाऊसाहेब वर्तक कॉलेज | (०२२) २८६७३४९८ |
| नालंदा कॉलेज | (०२२) २८६८८१८४ |
| सेंट. रॉक्स कॉलेज | (०२२) २८९१४१६१ |
| एल. एन. कॉलेज | (०२२) ६५०००७०१ |
| आनंदीबाई काळे कॉलेज | (०२२) २८६२५६८१ |
| एम.जे. ज्यु. कॉलेज | (०२२) २८६७०८०० |
| योजना कॉलेज | (०२२) २८८६०२४४ |
| **कांदिवली** | |
| ठाकुर कॉलेज | (०२२) २८४६२५६५ |
| केईएस कॉलेज | (०२२) २८०७२४७७ |
| निर्मला मेमोरीअल कॉलेज | (०२२) २८५४५४३९ |
| प्रकाश कॉलेज | (०२२) २८६११९५७५ |
| बालभारती कॉलेज | (०२२) २८६२८१७० |
| प्रगती ज्यु. कॉलेज | (०२२) २८६९२०७९ |
| निर्मला कॉलेज | (०२२) २८०७९३७६ |
| प्रथम कॉलेज | (०२२) २८८४११३३ |
| सेंट लॉरेन्स ज्यु. कॉलेज | (०२२) २८५४००७४ |
| **मालाड** | |
| मित्तल कॉलेज | (०२२) ६१६१४३२० |
| नगिनदास खांडवाला कॉलेज | (०२२) २८०७२२६२ |
| घनश्यामदास सराफ कॉलेज | (०२२) ६६८१२३४५ |
| टि.एस.बाफना ज्यु. गर्ल्स कॉलेज | (०२२) २८८२४८६० |
| प्रल्हादराय दालमिया लायन कॉलेज | (०२२) २८७३२२७० |
| विद्याविकास युनिवर्सल कॉलेज | (०२२) २८४४४०१४ |
| डि.टि.एस.एस. कॉलेज | (०२२) २८४००२१४ |
| आर. के. कॉलेज | (०२२) २८८०६०७९ |
| **गोरेगाव** | |
| यशोधाम ज्यु. कॉलेज | (०२२) २८४१४३१३ |
| गोकुळधाम ज्यु. कॉलेज | (०२२) ४०२७८२८६ |
| सेंट थॉमस ज्यु. कॉलेज | (०२२) २९२७६८९७ |
| लॉर्डस युनिवर्सल कॉलेज | (०२२) २८८०८५५२ |
| पाटकर कॉलेज | (०२२) २८७२१८७५ |
| विवेक कॉलेज | (०२२) २८२८१५३६ |
| रवींद्र भारती ज्यु. कॉलेज | (०२२) २८७६६०१७ |
| **जोगेश्वरी** | |
| इस्माईल युसुफ कॉलेज | (०२२) २८३५२८८१ |
| एच.के. इन्स्टिट्युट | (०२२) २६७८८७०९ |
| जेईएस कॉलेज | (०२२) २८२४५५२७ |

### अग्निशमन दल

| | |
|---|---|
| दहिसर | (०२२) २८९७७७०२ |
| बोरीवली | (०२२) २८६०२८४७ |
| कांदिवली | (०२२) २८०५०१०१ |
| मालाड (मार्वे रोड) | (०२२) २८०७१०१० |
| मालाड | (०२२) २८७६९१०१ |
| गोरेगाव (दिंडोशी) | (०२२) २८४०६७२९ |
| गोरेगाव | (०२२) २८७१२८६९ |

### पोलिस स्टेशन

| | |
|---|---|
| दहिसर | (०२२) २८२८४०२४ |
| बोरीवली | (०२२) २८९३०१४५ |
| एमएचबी कॉलनी | (०२२) २८६७७४०१ |
| गोराई | (०२२) २८४५१८२८ |
| कस्तुरबा मार्ग | (०२२) २८६५१४७७ |
| दौलत नगर | (०२२) २८९३०५०९ |
| कांदिवली (प.) | (०२२) २८०५०९०४ |
| कांदिवली (पू.) | (०२२) २८८७६१११ |
| चारकोप | (०२२) २८६७६५८१ |
| मालाड | (०२२) २८८२११४७ |
| दिंडोशी | (०२२) २८७८६३०० |
| मालवणी | (०२२) २८८२७५५७ |
| बांगूर नगर | (०२२) २८८१०१२१ |
| कुरार | (०२२) २८४०२१११ |
| गोरेगाव | (०२२) २८७२१९०० |
| वनराई | (०२२) २६८६१६७७ |
| ओशिवरा | (०२२) २६३२३८६१ |
| आरे सब पोलिस | (०२२) २९२७२४८४ |
| मेघवाडी | (०२२) २८२१०८६० |
| जोगेश्वरी | (०२२) २८२२१६७२ |
| पवई | (०२२) २५७०२६९० |
| सायबर क्राईम | (०२२) २६५०४००८ |
| पोलिस हेल्पलाईन | १०० |
| एल्डर लाईन | १०९० |
| चाईल्ड लाईन | १०९८ |
| महिला,लहानमुले, जेष्ठ नागरीक | १०३ |

Helpline
Brought to you By

Siddhitech Home Pvt.Ltd.
Sites at :Badlapur,Dahisar,Mahim & Chembur

For Booking Contact
Call: 022-66568383
Email: siddhitechhomes@ymail.com
www.siddhitechhomes.com

**Siddhitech Home Pvt.Ltd.**

Sites at :Badlapur,Dahisar,Mahim & Chembur




For Booking Contact
Call: 022-66568383
Email: siddhitechhomes@ymail.com
www.siddhitechhomes.com




*शरण सही है आत्म की, अन्य शरण ना कोय*
*आत्म-शरण, सद्धर्म-शरण, सत्य वचन सुख होय*
*पूजन अर्चन, वंदना, तो ही सार्थक होय*
*जीवन मे जागे धरम, पाप विसर्जित होय!*

# बोरीवलीचा ग्लोबल विपश्यना पॅगोडा
# मुंबईचा आध्यात्मिक चेहरा

भगवान गौतम बुद्ध यांना ज्ञान प्राप्त झाले आणि या युगपुरुषाने जगाला सत्य, शांती, सदाचार व निसर्गाच्या नियमांचा परिचय अगदी सोप्या व सरळ शब्दांत करून दिला. दु:खाचा उगम व अंत कोठे आहे हे उदाहरणासह पटवून दिले. पण, हे नियम कोणते आहेत? ती उदाहरणे कोणती आहेत? या महापुरुषाला नेमके कोणते ज्ञान प्राप्त झाले? या सर्व प्रश्नांची उत्तरे म्हणजे 'विपश्यना विद्या.' ही विद्या अवगत करून आयुष्य सुखी होते व शेवटी आनंदी होतो. अशी ही महत्त्वपूर्ण विद्या शिकण्याचे, त्याचा अभ्यास करण्याचे व त्याबद्दल जाणून घेण्याचे स्थान म्हणजेच पॅगोडा. अशी ही आध्यात्मिक व भव्यदिव्य वास्तू मुंबईतील बोरीवलीच्या गोराई खाडीजवळ उभी आहे.

या पॅगोडाच्या उभारणीचे सर्व श्रेय विपश्यनाचार्य सत्यनारायण गोयंका यांना आहे. यामागच्या त्यांच्या उद्देशालाही तेवढेच महत्त्व आहे. कारण, अडीच हजार वर्षांपूर्वी राजकुमार सिद्धार्थने अथक परिश्रम करून या विद्येचा शोध लावला. या विद्येचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी गौतम बुद्धांनी भिक्खुंना जगभरात पाठवले.

त्यानंतर सम्राट अशोकाने अफगाणिस्तानापासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या अखंड भारत देशात ठिकठिकाणी शिलालेख उभारून या विद्येचा प्रचार व प्रसार केला. काही काळानंतर ही महत्त्वपूर्ण विद्या भारतातूनच नाही, तर जगातून लुप्त झाली. पण, म्यानमार देशात ही विद्या तिच्या मूळ व शुद्ध स्वरूपात गुरु-शिष्य परंपरेने टिकून होती. म्यानमारमधील विपश्यनाचार्य सयाजी ऊ बा खिन यांच्याद्वारे गोयंका यांना ही विद्या मिळाली. त्यांनी या विद्येला पुन्हा जगभरात पोहोचवले. त्याच वेळी गोयंका हे या विद्येला शुद्ध स्वरूपात जिवंत ठेवणाऱ्या म्यानमारचे व विपश्यनाचार्य सयाजी ऊ बा खिन यांचे ऋण विसरले नाहीत.

या ऋणांची आठवण सदैव भारतासह सर्व जगाला राहावी यासाठी गोयंका यांनी या पॅगोडाची मांडणी म्यानमारमधील प्रसिद्ध श्वेडगॉन पॅगोडाप्रमाणे केली आहे. यामागील अजून एक कारण असे की, जेव्हा ही विद्या भारतातून शेजारील देशांमध्ये गेली त्या वेळी तेथे भव्य स्तूप बांधले गेले. हे स्तूप त्या वेळच्या भारतातील स्तूपांच्या प्रतिकृतीप्रमाणे होते. भारताकडून ही विद्या मिळाली याची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हे स्तूप बांधले गेले होते. आज ही विद्या म्यानमारकडून भारताला मिळाली आहे. हे ऋण प्रत्येकाच्या स्मरणात राहावे यासाठी हा पॅगोडा म्यानमारमधील पॅगोडाप्रमाणेच बांधला गेला आहे.


गुरुदेव विपश्यनाचार्य सयाजी ऊ बा खिन

**1** या पॅगोडाचे महत्त्व विशद करताना गोयंका हे प्रत्येक वेळेस म्यानमारची व विपश्यनाचार्य सयाजी ऊ बा खिन यांच्या ऋणांची आठवण करून देतात. यांच्यामुळे जगभरातील कोट्यवधी लोकांना ही विद्या शुद्ध स्वरूपात मिळाली. येणाऱ्या प्रत्येक पिढीला ही विद्या तिच्या शुद्ध स्वरूपातच मिळावी यासाठी विपश्यनेत कोणत्याही प्रकारची मिलावट करू नये, असे आवाहनही गोयंका करतात.

**2** असे हे महान स्तूप मुंबईत उभारल्याने आर्थिक राजधानी अशी ओळख असलेल्या या शहराला अध्यात्माचाही चेहरा मिळाला आहे. कारण, देशासह परदेशातील लाखो पर्यटक या पॅगोडाला भेट देत असतात. या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. पण, याचे खरे महत्त्व विपश्यना करणाऱ्याला अधिक कळते. ते जाणून घेण्यासाठी प्रत्येकाने एकदातरी १० दिवसांचे शिबिर करावे, असे गोयंका वारंवार सांगतात.

**3** एका खाजगी वाहिनीने केलेल्या सर्वेक्षणानुसार, या ऐतिहासिक पॅगोडाची नोंद महाराष्ट्रातील सात आश्चर्यांमध्ये करण्यात आली आहे. यामुळे मुंबईसह बोरीवलीच्याही शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

यातील अजून एक वैशिष्ट्य असे की, या पॅगोडाची उंची व रुंदी एकसमान म्हणजेच ९४.७० मीटर आहे. कारण, भगवान बुद्ध जेव्हा ध्यानस्थ मुद्रेत असायचे त्या वेळी त्यांच्या शरीराची रुंदी व उंची एकसमान असायची; तसेच गौतम बुद्धांची काया सोनेरी रंगासारखी होती. त्यामुळे पॅगोडालाही सोनेरी रंग दिला जातो व सुवर्णपत्र्यांनी त्याला सजवले जाते. याच्या अग्रस्थानी नाजूक व आकर्षक मुकुट असतो. पॅगोडाला आठ खांब आहेत जे अष्टांग मार्गाचे प्रतीक आहेत, ज्यातून शिलाचे दर्शन घडते. पॅगोडाचा घुमटासारखा आकार हा समाधीचे तर त्याच्यावरील केंद्र भागातून प्रज्ञेचे प्रतिबिंब उभे राहते. या घुमटावर सात पायऱ्यांप्रमाणे कोरीव काम करण्यात आले आहे. जे या विद्येचे सात प्रमुख टप्पे आहेत. प्रत्यक्षात पॅगोडाची मांडणी म्हणजे विपश्यना विद्येची प्रतिकृतीच आहे. कारण, शील, समाधी व प्रज्ञा हेच या विद्येचे सूत्र आहे.

**अमर मोहिते**

या पॅगोडात एकावेळी ८ ते १० हजार व्यक्ती एकत्र बसून विपश्यना विद्येचा अभ्यास करू शकतात. या विद्येचा एकत्र अभ्यास करण्यालाही वेगळे महत्त्व आहे. बुद्धवाणीत ते विशदही केले आहे. बुद्धवाणीत याचे वर्णन 'समग्गानं तपो सुखो' असे करण्यात आले आहे. याचा अर्थ एकत्रितपणे ध्यान करणे अधिक सुखकारक व लाभदायी असते. विशेष म्हणजे या पॅगोडाच्या केंद्रस्थानी भगवान बुद्धांच्या पवित्र अस्थी ठेवण्यात आल्या आहेत. या अस्थींचेही महत्त्व बुद्धवाणीत आहे. या अस्थींमुळे साधना करणाऱ्याला अधिक बळ व प्रेरणा मिळते, असे बुद्धवाणीत म्हटले आहे. या पॅगोडामुळे एकाच वेळेस हजारो व्यक्ती ध्यान करू शकतात. त्यांना बळ देण्यासाठी येथे बुद्धअस्थीही आहेत.

हा पॅगोडा उभा असलेल्या भूखंडालाही बुद्धकालीन व्यक्तींचे महत्त्व आहे. त्याचदृष्टीने हा भव्यदिव्य पॅगोडा उभारण्यासाठी या जागेची निवड केली गेली. कारण, नालासोपारा येथील ऋषी बाहिय दारुचीरिय हे गौतम बुद्धांना भेटण्यासाठी येथून पायी चालत श्रावस्तीला गेले होते; तसेच येथीलच एक श्रावक भगवान बुद्धांकडून ही विद्या शिकला व परत येथे येऊन त्याने या साधनेचा प्रचार आणि प्रसार केला. येथून जवळपास असलेल्या कान्हेरी, कार्ला, महाकाली, भाजा, अजंठा व अलोरा गुंफा येथे ही विद्या शिकवली जात होती.

या भूमीच्या तिन्ही बाजूंना समुद्र असून, तिवराची झाडे आहेत व येथे येण्यासाठी एक स्वतंत्र रस्ताही आहे. हेदेखील या जागेची निवड करण्यामागचे एक कारण आहे. या पॅगोडाची आखणी करताना सर्व बाजूंचा विचार केला गेला. हा पॅगोडा किमान दोन हजार वर्षांपर्यंत टिकून राहील अशा प्रकारे याचे नियोजन करण्यात आले; तसेच या पॅगोडावर हवा, पाणी व भूकंपाचाही काही परिणाम होणार नाही अशा प्रकारे याचे बांधकाम करण्यात आले आहे.

हा पॅगोडा उभारणीचे नियोजन १९९७ साली सुरु झाले व प्रत्यक्ष बांधकाम २००४मध्ये सुरु झाले. म्यानमारमधील पॅगोडा ३३० फूट उंचीचा आहे तर गोराई येथील पॅगोडा ३२५ फूट म्हणजे ३० मजली इमारतीएवढा उंच आहे. या पॅगोडाचा घुमट २८० फूट व्यासाचा आहे. महत्त्वाचे म्हणजे एकही खांब न उभारता व लोखंडाचा वापर न करता बनविण्यात आलेला हा जगातील सर्वांत मोठा घुमट आहे. याचे संपूर्ण बांधकाम दगडांचे आहे. हा घुमट विजापूरच्या इतिहासप्रसिद्ध गोल घुमटाच्या तीन पटीने भव्य आहे. दगड परस्परांत गुंफून हा घुमट बनविण्यात आला आहे. या घुमटावर आकाशाकडे झेपावणारा उंच मनोरा आहे. त्यासाठी २५ लाख टन जोधपुरी दगड वापरण्यात आले आहेत. या प्रमुख पॅगोडाच्या उभारणीस सुमारे ११ वर्षे लागली. पॅगोडा संकुलासाठी एस्सेल वर्ल्डने दान स्वरूपात जमीन दिलेली आहे. पॅगोडाच्या दरवाजांवर असलेल्या बर्मा टीकवूडवर गौतम बुद्धांच्या जीवनावरील चित्रे काढण्यात आली आहेत. प्रमुख पॅगोडाच्या उत्तरेस ९० फूट उंचीचा छोटा पॅगोडा उभारण्यात आला आहे; तर पूर्वेस अशोकस्तंभ असून, त्याच बाजूला आणखी एक लहानसा पॅगोडा आहे. म्यानमारमधून आणलेल्या खास सोनेरी रंगाने पॅगोडाचे बाह्यांग आणि कळस रंगविण्यात आला आहे. परिक्रमेसाठी दुर्मीळ अशा संगमरवर दगडांचा मार्ग तयार करण्यात आला आहे. या परिसरात गौतम बुद्धांची ध्यानस्थ मूर्ती आहे. तेथे 'आध्यात्मिक जगतातील महान वैज्ञानिक' असे भगवान बुद्धांना संबोधले आहे. कारण, राजकुमार सिद्धार्थ यांनी अनेक वर्षे संशोधन करूनच या विद्येचा शोध लावला. येथील अशोक स्तंभावर चारही दिशेकडे गर्जना करणारे सिंह उभे आहेत. जणू हे सिंह भगवान बुद्धांच्या शिकवणीचीच गर्जना करीत आहेत.


**अंधेरी आणि परिसरातील नागरी समस्या सातत्याने मांडणाऱ्या लोकमतच्या "सिंहावलोकन – अंधेरी तालुका" विशेषांकास**

**मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा**





**देवेंद्र (बाळा) आंबेकर**
**काँग्रेस नगरसेवक, प्रभाग क्र. ५७**